# कमला कॉलेजच्या स्वायत्ततेसाठी युजीसीची पाहणी

## शैक्षणिक प्रगतीसह प्राथमिक सोयीसुविधांवर होणार शिक्कामोर्तब

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तज्ज्ञ समितीने ऑक्टोबरमध्ये कमला कॉलेजची पाहणी करून स्वायत्ततेसाठी कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम, प्राथमिक सोयी-सुविधांची पाहणी केली. प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी त्यांना माहिती दिली. यासाठी ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

कमला कॉलेजला स्वायत्तता देण्यासाठी युजीसीच्या समितीचे अध्यक्ष लखनऊ येथील बाबासाहेब आंबेडकर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. संजय सिंग, युजीसी अंडर सेक्रेटरी व्ही. तलरेजा, इंदिरा गांधी ओपन युनिव्हर्सिटीचे डॉ. सतीशकुमार, प्राचार्य सुरेश सिलावत, कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. हेमंत कटरे, प्राचार्य डॉ. धनाजी कणसे यांनी पाहणी केली. कॉलेजमधील अभ्यासक्रम, वार्षिक निकालाची टक्केवारी, प्लेसमेंट, कला, क्रीडा आदी क्षेत्रातील शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला.



**कोल्हापूर : कमला कॉलेजच्या पाहणी दरम्यान परिसरातील महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना युजीसीच्या कमिटीसह कमला कॉलेजचे पदाधिकारी.**

डॉ. वर्षा मैंदर्गी यांच्यासह विविध विभागप्रमुखांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन करून आपल्या कार्याची माहिती दिली. ही समिती युजीसीकडे अहवाल सादर करेल. त्यानंतर युजीसी स्वायत्तता द्यायची की नाही याचा निर्णय जाहीर करेल. कमला कॉलेज प्रशासनाला स्वायत्तता मिळणार, असा विश्वास आहे. या कामासाठी ताराराणी विद्यापीठाचे सेक्रेटरी प्राजक्त पाटील, उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, प्रकाश हिलगे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned by CamScanner